'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक
Vol. 3 Issue. 3
July-Sept.- 2016

# कविता महाजन यांचे काव्यलेखन

**प्रा.डॉ. दिलीप पी.पवार**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक (महाराष्ट्र)

*अलिकडच्या काळात ज्यांच्या स्वत्वयुक्त लेखनांनी लक्ष वेधलं जातं त्यामध्ये कविता महाजन यांचा आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. विशेषत: त्यांचे कवितालेखन. साहित्य हा कविता महाजन यांच्या चिंतनाचा ठळक भाग आहे. सामाजिक समस्यांत–विशेषत: आदिवासी स्त्रियांच्या समस्या ह्या त्यांच्या संशोधनाचा व विचारांचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. आपल्या समकालीन समाज जीवनातील स्त्रियांच्या समस्यांना त्यांनी आपल्या लेखनामधून वाचा फोडल्याचे दिसून येते.*

मराठवाड्यातील एका सुशिक्षित आणि संस्काराचे संवर्धन करणाऱ्या घरात त्यांचा जन्म झाला. त्यामुळे बालपणीच त्यांना कुटुंबातून वाचन लेखनाचा संस्कार लाभला. कविता महाजन यांचे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण नांदेड येथेच पूर्ण झाले. पुढे पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्या यु.जी.सी. तर्फे घेतली जाणारी नेट परीक्षाही उत्तीर्ण झाल्या. त्याचबरोबर आधुनिक काळातील माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षणही त्यांनी पूर्ण केले. त्या स्वत: एक चांगल्या चित्रकार आहे. कविता महाजन या समकालीन कालखंडातील एक महत्त्वाच्या कवयित्री आहे. आतापर्यंत त्यांनी 'ब्र', 'भिन्न' व 'ठकी आणि मर्यादित पुरुषोत्तम' यासारख्या महत्त्वाच्या तीन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. याशिवाय अनुवाद, लोकसाहित्य, कोश लेखन व स्फूटलेखन मोठ्या प्रमाणात केले आहे.

कविता महाजन हे नाव मराठी साहित्याच्या क्षितिजावर आले ते एक कवयित्री म्हणून. स्वानुभवांना आपल्या लेखनात मांडून त्या लेखनाला वास्तवाची जोड देऊन लेखन करणाऱ्या त्या एक महत्त्वाच्या लेखिका ठरतात. त्यांच्या संपूर्ण साहित्याच्या मागे 'लोक' ही प्रमुख प्रेरणा त्या मानतात. आतापर्यंत त्यांचे 'तत्पुरुष', 'धुळीचा आवाज', 'मृगजळीचा मासा' आणि 'समुद्रच आहे एक विशाल जाळं' असे चार कविता संग्रह प्रकाशित आहे. कविता महाजन यांच्या या काव्यसंग्रहांतील लक्षवेधी कवितेचे वेगळेपण, त्यांच्या जीवन जाणिवा मांडण्याचा प्रयत्न या लेखात केलेला आहे.

**'तत्पुरुष' (२००५) – मधील कवितेचे वेगळेपण :**

'तत्पुरुष' हा कविता महाजन यांचा पहिला काव्यसंग्रह. या काव्यसंग्रहातील बऱ्याच कविता मराठी नियतकालिकांतून पूर्व प्रसिद्ध झाल्या. कवयित्रीने सुरुवातीच्या काळात ज्या कविता लिहिल्या त्या सर्व कवितांचा या संग्रहात समावेश केल्याचे दिसून येते. या संपूर्ण संग्रहात ६१ कवितांचा समावेश केला आहे. हा संग्रह चंद्रकांत पाटील यांच्या तुला प्रकाशन औरंगाबाद यांच्याकडून प्रकाशित झालेला आहे. 'तत्पुरुष' या कवितासंग्रहाचे शीर्षक वैशिष्ट्यपूर्ण व अर्थपूर्ण दिसून येते. त्यांचा हा पहिला कवितासंग्रह कवयित्रीच्या अनुभव व तीव्रतर आवेश स्पष्ट करणारा आहे. या कवितासंग्रहात सर्व सामान्य स्त्रियांचे कौटुंबिक जीवनातील ताणतणाव थेट भाषेत व्यक्त करणारे आहेत.

'तत्पुरुष' या काव्यसंग्रहाच्या या कवितांमधून एक स्त्री आढळते. त्या स्त्रीला आत्मभान प्राप्त झालेले दिसते. कुठलेच आधाराचे बोट न धरता हा अंधार चिरून पलिकडे जावं असा निर्धार व आत्मविश्वास तिच्यामध्ये आहे. 'आपणच' या कवितेमधून ते अधिक ठळकपणे दिसून येते.

**"...आपणच झाड, आपणच पार;**
**...आपणच मुळं, आपणच फुलं'' (तत्पुरुष –पृ.६७)**

या काव्यसंग्रहातून स्त्रीत्वाचे वेगवेगळे कंगोरे सूचित होतात. यातील बहुतांशी कविता ह्या 'गुलाम–नोकर' या नात्याने लिहिल्या आहेत. कवयित्रीने सर्वसामान्य कुटुंबातील गृहिणींच्या दैनंदिन जीवनाचा तपशील थेटपणे मांडला आहे. या संग्रहात सामाजिक वास्तवाला कलात्मकतेची उत्कृष्ठ जोड कवयित्रीने दिली आहे.

कविता महाजन यांच्या 'हेवा', 'शालीन' यासारख्या कवितांमधून स्त्रियांचे होणारे सामाजिक शोषण आणि स्त्रियांकरवी होणारे शोषण अशा दुहेरी पातळयांवरचे चित्रण महाजन करतात.

**उदा.**

**"मालक नसलेल्या बाईजवळ**
**जात नाहीत चुकूनही**
**मालक असलेल्या बाया**
**तिला पाहताच आधी त्या**
**नीट करतात आपलं कुंकू...'' (पृ. ३८)**

अशाप्रकारे स्त्री जीवनाचा आंतरिक पाठ व विसंगत वर्तन कलात्मकपणे व उपहास व उपरोध यांच्या साहाय्याने चित्रित करतात.

कवयित्री स्त्री जीवनाशी निगडित सामाजिक समस्यांवर 'सौदा', 'समाधान', 'मालकत्त्व', 'घाण' इ. कवितांमधून नेमकं बोट ठेवतात. 'ओरखडा' सारख्या लहानशा कवितेमधून सर्व स्त्रियांच्या वेदनेला त्या जणू शब्दबद्ध करतात.

**"प्रत्येक ओरखडा**
**एक सारखा नसतो**
**जरी सारे**
**एकाच नखाची असले तरी...'' (पृ. ६८)**

या कवितेतून स्त्री वेदनेचे अनेक कंगोरे अर्थपूर्णरित्या सूचित केले आहेत. या काव्यसंग्रहात स्त्री जीवनविषयक दु:खाची प्रखर जाणीव व्यक्त होताना दिसते. तसेच ज्या व्यवस्थेमुळे तिला दु:ख प्राप्त झाले आहे त्या व्यवस्थेला नकार देण्याची भाषा आहे.

**"बाई नाकारते आता**
**रोजच्या रोज पहाटे अंघोळीनंतर**
**स्वच्छ मोकळया कपाळावर कुंकू लावणं**
**दिवसाची सुरुवातच लाल भडक**
**पूर्णविरामानं करणं'' (पृ. ५१)**

एकूणच या संपूर्ण संग्रहात स्त्रीच्या जगण्याचा वर्तमान काळातील आत्मशोध व आत्मभान घेण्याचा प्रयत्न दिसून येतो. या संपूर्ण कवितासंग्रहात 'गुलाम–मालक' स्वरूपाच्या व काही अंशी मार्क्सवादी विचारांतून स्त्री–पुरुष यांच्या नात्याकडे बघण्याचा एक प्रयत्नही केलेला दिसून येतो.

**'धुळीचा आवाज' (२००६) मधील कविताविश्व :**

'धुळीचा आवाज' हा कविता महाजन यांचा दुसरा काव्यसंग्रह. या काव्यसंग्रहात एकूण ६५ कविता आहेत. या काव्यसंग्रहातील काही कविता वेगवेगळया नियतकालिकातून पूर्वप्रसिद्ध झालेल्या आहेत. या संपूर्ण

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

संग्रहात भासाचं आभासाचं, स्वप्नांचं, सुख–दुखांच्या वास्तवाचं अद्‌भुत द्रव्य शोषून घेत 'धुळीचा आवाज' मधील कविता विकसते; आत्मानुभवाचं अपारंपरिक रूप उत्कटपणे प्रकट करते व सिमित केंद्रातून मुक्त होत व्यापक पातळीवर रसिकांशी संवाद साधते.

या संपूर्ण संग्रहात एका प्रेयसीचे आत्मगत विचार 'मी आणि तू' या पातळीवर व्यक्त करताना दिसते.

चित्रकाराच्या नजरेतून आणि उत्कट संवेदनशील मनाच्या अनुभवामधून 'भास', 'ऊबदार', 'लॅन्डस्केप', 'तुझ्या निमित्तानं' यासारख्या कवितांमधून विविध इंद्रिय संवेदनाचा प्रत्यय येतो.

उदा.

**"कदाचित हा स्वर असेल**
**बदामाच्या केशरी पानांमधून वाहणाऱ्या वाऱ्याचा;**
**किंवा गळयावर लाल रेषा असलेल्या**
**काळ्याभोर एकाकी पक्ष्याचा;**
**किंवा माझ्या पत्रातील फडफडणाऱ्या**
**एखाद्या गडद निळ्या शब्दाचा.... (कदाचित)'' (पृ.२६)**

यासारख्या अनेक कवितांमधून भरभरून स्वरूपात इंद्रिय स्वरूपांचा प्रत्यय येतो.

या संपूर्ण काव्यसंग्रहातील कवितांमधून कवियित्रीच्या मनन चिंतनाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू असलेला एक 'चित्रकार' प्रत्ययास येतो. 'धुमसता आवाज' या कवितेमधून आलेला,

**"कुठून येतोय सतत हा धुळीचा**
**धुमसता आवाज**
**माझ्या घराची शांतता बाधवत?'' (पृ. १९)**

ह्या कवितेतील, संग्रहातील हा प्रश्न, अधिक महत्त्वाचा वाटतो. याच काव्यसंग्रहातील काही कविता नव्वदोत्तरी कवितेचे, महानगरीय संदर्भ शोधते... मांडते. या संग्रहात त्या पूर्णता नात्यांतील अलगता, एकटेपणा निर्देशित करतात.

**'मृगजळीचा मासा (२००८) मधील कवितांचे विशेष'** :

'मृगजळीचा मासा' हा कविता महाजन यांचा तिसरा कवितासंग्रह आहे. या तिसऱ्या संग्रहात देखील 'धुळीचा आवाज' ह्या संग्रहातील 'मी–तू' च्या रितीने एक रूपक केंद्रित केल्याचे दिसून येते.

कविता महाजन यांचा हा तिसरा काव्यसंग्रह आधीच्या दोन्ही संग्रहांपेक्षा अधिक व्यापक अर्थपूर्ण अनुभव कलात्मकपणे व्यक्त करताना दिसतो. या संपूर्ण कवितासंग्रहात ८५ कवितांचा समावेश आहे.

या कवितासंग्रहाच्या प्रारंभीच्या मनोगत.... अर्पणपत्रिकेत

**"दिवास्वप्नांना**
**त्यांमुळे स्वप्न पाहण्यासाठी आणि ती**
**प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करण्यासाठी**
**मी जीवंत राहू शकेल'' (मनोगत)**

या प्रेम कवितांमध्ये 'मी–तू चे हे द्वैत आहे. तसा मी–तू–ती मधला प्रेमाचा पारंपरिक त्रिकोणाकडे भावसौंदर्य दृष्टीने चित्रण केले आहे. भावावेग व अनेकार्थी भाषा आहे. या संग्रहात 'प्रेम हे प्रेम असतं ते भ्रम

नसतं असा संदेश दिला आहे, विचार व्यक्त केला आहे. प्रा. प्रकाश देशपांडे केजकर यांनी 'समकालीन मराठी कविता एक निरीक्षण' या ग्रंथात "या कवयित्रीच्या कविता शेवटच्या पर्वात कालबाह्य झालेल्या नवसौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेकडे वळते. ही स्त्रीवादी कवितेची उफराटी वाटचाल चिंताजनक आहे'' हे मत कवियित्रीच्या काव्यलेखनाच्या (पृ. ११७) वाटचाली संदर्भात विवेकी मत वाटते.

उदाहणार्थ :

**"स्वप्नातसुद्धा मी पाहत राहणे पुन्हा एक स्वप्न**
**की निदान तुझ्या स्वप्नात तरी**
**तू उघडशील दार माझ्यासाठी**
**बोलावशील आत, बोलशील'' (स्वप्नात सुद्धा) (पृ. २७)**

**किंवा**

**"कवितेतून कुणापर्यंत तरी पोहोचायचा प्रयत्न**
**म्हणजे कागदाच्या नावेत बसून**
**पुरानं घोंघवणाऱ्या नदीत उतरून**
**पैलतीरावराच्या प्रियकराला भेटायला जाणं''**

यासारख्या कवितांमधून ज्यातून कवियित्रीचा कल स्त्रीवादी लेखनाकडून भावसौंदर्यवादी दृष्टिकोनाकडे वळताना दिसतो.

**'समुद्रचं आहे एक विशाल जाळं (२१६) मधील लक्षवेधी कविता'** :

कविता महाजन यांचा हा चौथा काव्यसंग्रह राजहंस प्रकाशनातर्फे तो २०१६ प्रसिद्ध झाला. ह्या संग्रहाचे वेगळेपण म्हणजे ही एक दीर्घकविताच होय. यात आलेले समुद्रातील एका मासळीचे जीवन प्रतीकात्मकरित्या चित्रित केले गेले आहे. अर्थातचं हे चित्रण मानवी जीवनाचेच आहे.

मानवी जीवनातील सनातनी (चिरंतन) मूल्ये आणि समाज जीवन यातील सुप्त–असुप्त संघर्षाचे या दीर्घकवितेत चित्रण आले आहे. मानवी जगण्याची इच्छा, अपेक्षा त्यालाच अनुषंगाने असणारी मृत्यू ज्यासंबंधीचे गुढ पद्धतीने हे चित्रण केले गेले आहे.

मानवी जगण्यातील अर्थपूर्णता निरर्थकता, आशयसमृद्धता – आशयशून्यता या संघर्षातून कधी–कधी वाट्याला आलेलया मानवी अस्तित्वाची शून्यता (परकेपणा) जाणीव, मृत्यूची जाणीव या संबंधी विचारप्रधान, चिंतनात्मक असे काव्य वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

**"जे सांगायचंय ते हे नाहीये नव्हतं आणि नसेल**
**जो शब्द मला उच्चारायचा आहे**
**तो आहे माझ्या आत'' (पृ. ३५)**

यासारख्या ओळी वाचकांची उत्कंठा वाढवतात. त्याबरोबर पुढे वाचायला गेल्यावर ध्यानात येते की, अवाढव्य समुद्रात (जगात) जगणं, स्वत:ला बचावत–बचावत जगणं कठीण आहे. यासंबंधीचे प्रत्ययकारी चित्रण वारंवार वाचावं अस्सं काहीसं वाचकांना अनोखं वाचायला मिळतं व सुजाण वाचकांस अरुण कोल्हटकरांच्या दीर्घकवितांची निश्चित आठवण होते.

डॉ. सुधीर रसाळ यांचे ह्या संग्रहाबाबतचे विचार अत्यंत मर्मग्राही, वाचनीय स्वरूपाचे आहेत.

निष्कर्ष :

१. कविता महाजन यांची कविता सामाजिक वास्तव कलात्मकतेने मांडते.
२. ही कविता आत्मानुभवाचे अपारंपरिक रूप सहज व्यक्त करते.
३. कविता महाजन यांची कविता स्त्रीवादाकडून भावसौंदर्याकडे वळताना दिसते.
४. मानवी जीवनातील मूल्ये व समाजजीवन यातील संघर्षाचे चित्रण करणारी महाजनाची कविता वेगळ्या आशा निर्माण करते.

संदर्भ :

१. 'तत्पुरुष'– कविता महाजन, तुला प्रकाशन, औरंगाबाद – (जाने. २००५)
२. 'धुळीचा आवाज', कविता महाजन, मौज प्रकाशन, मुंबई (२००६ सप्टेंबर)
३. 'मृगजळीचा मासा' कविता महाजन, राजहंस प्रकाशन, पुणे, (ऑगस्ट, २००८)
४. 'समुद्रचं आहे एक विशाल जाळं', कविता महाजन, राजहंस प्रकाशन, पुणे – फेब्रु (२०१६).